# दक्षिण आशियाई देशांतील संघर्ष

**प्रा. डॉ. रविंद्र भणगे,** प्राध्यापक, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

.....................................................................................................................

प्रस्तावना

दक्षिण आशियाई क्षेत्रामध्ये भारत, पाकिस्तान, भूतान, बांग्लादेश, श्रीलंका, म्यानमार, नेपाळ आणि मालदीव देशांचा समावेश होतो. ही दक्षिण आशियाई राष्ट्रे भौगोलिकदृष्टया सलग असले तरी या राष्ट्रांमध्ये बहुलसंस्कृती दिसून येते. या देशातील धर्म, वंश, विकास हे तिन्हीही घटक तेथील समाजजीवन, राजकारणावर प्रभाव टाकत असतात. दक्षिण आशियाई राष्ट्रातील प्रत्येक राष्ट्राची स्वतंत्र ओळख आहे. त्याचा इतिहास जरी ब्रिटीशांच्या साम्राज्यवादाशी निगडीत असला तरी त्यांचे समाजजीवन तेथील राजकीय प्रक्रिया भिन्नभिन्न आहे. त्यामुळे तेथील व्यवस्था ही भिन्न स्वरूपाची दिसते व त्यातून निर्माण झालेले प्रश्नही त्या व्यवस्थेला आव्हान देणारे आहेत. या दक्षिण आशियाई राष्ट्रात प्रत्येक गट आपली स्वत:ची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. व त्यातून तेथे संघर्ष झालेला दिसतो.

**दक्षिण आशियाई राष्ट्रे व संघर्ष**

**१) भारत**

भारत हा दक्षिण आशियाई राष्ट्रातील भौगोलिक, लोकसंख्या व सामर्थ्याच्या बाबतीत मोठा आहे. त्याचा प्रभाव दक्षिण आशियाई राष्ट्रांवर पडलेला दिसतो. भारत हा १९४७ ला ब्रिटीशांपासून स्वतंत्र झाला. भारत एक धर्मनिरपेक्ष व लोकशाही राष्ट्र आहे. भारतामध्ये बहुसंस्कृती दिसून येते. भारतात हिंदू, मुस्लिम, जैन, बौद्ध धर्माच्या लोकांचे वास्तव्य आहे. भारतात सुरूवातीपासूनच हिंदु—मुस्लिम या दोन धर्मामध्ये संघर्ष दिसून येतो. हा संघर्ष कधी कधी दंगलीचे स्वरूप प्राप्त करतो व यातूनच अल्पसंख्य मुस्लिम आपली ओळख ठसवण्याचा प्रयत्न करतात. भारतामध्ये विकासाचा संघर्ष असला तरी धार्मिक संघर्षाइतका तिव्र नाही. भारतातील दहशतवादी समस्या ही धार्मिक संघर्षाशी निगडीत आहे. यात काश्मिरचा प्रश्न ज्वलंत आहे. या प्रदेशात काश्मिरीयतचा प्रश्न उग्र स्वरूप धारण करत नाही. त्याचप्रमाणे काश्मिर पंडितांनाही स्वत:ची ओळख निर्माण करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. त्याचबरोबर भारताच्या ईशान्य भागामध्ये जी ७ राज्ये आहेत, त्यांच्यात वांशिक संघर्ष आपल्या स्वत:च्या अस्तित्व टिकवण्यासाठी दिसून येतो यात बोडो, नागा इत्यादी वंशियामध्ये संघर्ष दिसतो. सध्या या भागात प्रत्येक वंश आपले स्वतंत्र अस्तित्व व संस्कृती टिकवण्यासाठी हिंसक संघर्ष करत आहेत व येथे विकासाचा मुद्दा महत्त्वपूर्ण ठरत आहे. भारतातल्या या दोन प्रदेशात धार्मिक व वांशिक संघर्ष चाललेला आहे. तो कमी करणे अथवा समाप्त करणे हे भारतातील शासनाचे कर्तव्य आहे. त्याकरिता शासन व्यवस्था कार्य करताना दिसते.

**२) पाकिस्तान**

पाकिस्तानची निर्मिती ही धर्माच्या आधारावर झालेली आहे. पाकिस्तान हा मुस्लिम धर्मिय राष्ट्र असून या राष्ट्राने द्वि राष्ट्राचा सिद्धांत स्विकारलेला आहे. पाकिस्तानात जसा धर्माचा संघर्ष हा तेथे प्रादेशिक विकासाचाही संघर्ष दिसून येतो. पाकिस्तानमध्ये हिंदू—मुस्लिम संघर्ष हा धार्मिक संघर्ष दिसत असला तरी पाकिस्तानात मुस्लिमांमध्ये शिया—सुन्नी असे दोन पंथ असून या दोन्ही पंथामध्ये तेथे संघर्ष दिसतो. तसेच स्थानिक विरोधात मोहाजिर असाही संघर्ष पहावयास मिळतो. तसेच पाकिस्तानातील अस्थिर राजकीय व्यवस्था असून त्यात लष्कराचा हस्तक्षेप दिसतो. कधी—कधी लष्करच देशाची व्यवस्था चालवत असते. या लष्करी व्यवस्थेचे धार्मिकीकरण झाल्याने पाकिस्तानात धर्माच्या अंतर्गत संघर्ष वाढला आहे. जो दहशतवादाच्या रूपाने तेथे हिंसक स्वरूपात दिसून येतो. पाकिस्तानात धार्मिक संघर्षाप्रमाणेच प्रादेशिक संघर्षही तीव्र आहे. ज्यात पंजाब व सिंध प्रांताचे पाकिस्तानातील आर्थिक व राजकीय क्षेत्रात वर्चस्व दिसून येते. पण बलुचिस्तान या प्रदेशाचा प्रभाव दिसून येत नाही. भविष्यकाळात पाकिस्तानमध्ये बलुचिस्तानमधील संघर्ष देशाच्या अखंडतेला बाधा आणणारा ठरू शकतो. पाकिस्तानला मिळणाऱ्या साधन संपत्तीमध्ये सर्वात जास्त भार बलुचिस्थानातील प्रदेशाचा आहे. पण या प्रदेशातील लोक मागासलेले आहेत. यामुळे प्रादेशिक संघर्षात भविष्यकाळात तीव्र होणार असल्याचे दिसते.

**३) श्रीलंका**

भारतातील दक्षिण असलेला श्रीलंका देश भौगोलिकदृष्टया हिंदी महासागरातील महत्त्वपूर्ण देश आहे. या देशामध्ये बौद्ध धर्माचा प्रभाव असून बौद्ध व हिंदू तमिळ असा दोन धर्माचा प्रभाव या देशात आहे. पण यात तमिळ वंशाची लोकसंख्या अल्पसंख्यांक आहे. श्रीलंका देशात बौद्ध व हिंदू यांच्यात धार्मिक, वांशिक संघर्ष असून हिंदू धर्माचे तमिळ वंशाचे लोक आपले नागरिकत्व मिळवण्यासाठी व स्वत:ची ओळख देशात निर्माण करण्यासाठी संघर्ष करत आहेत. श्रीलंकेच्या लोकसंख्येचा विचार करता बौद्ध धर्माचा स्विकार केलेले सिंहली वंशाची ७४ टक्के व हिंदू धर्माचे तमिळ वंशाची १२ टक्के लोकसंख्या आहे. यातील सिंहली वंशाचा प्रभाव श्रीलंकेच्या आर्थिक, राजकीय क्षेत्रावर प्रभाव असून तमिळ वंशाचा प्रभाव कमी दिसतो. तसेच श्रीलंकेतील शासन व्यवस्थाही तमिळ वंशाबरोबर, भेदभावावर आधारित धोरण राबवत असल्याचे दिसते. यामुळे तेथे सिंहली व तमिळी वंशाचा संघर्ष दिसतो. तो संघर्ष श्रीलंकेत यादवीची परिस्थिती निर्माण करतो. यात तमिळांचा श्रीलंकेच्या नागरिकत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच या संघर्षातून निर्वासितांची समस्याही निर्माण झालेली दिसते.

**४) नेपाळ**

नेपाळ हा भूस्वरूपामध्ये पहाडी प्रदेशातील देश असून नेपाळ ही 'पवित्र भूमी' मानली जाते. येथे बौद्ध धर्माचे (१०.७%) व हिंदू धर्माचे ८०.६% व इस्लाम धर्माचे ४.६% लोकसंख्या असून नेपाळमध्ये विकासाचे राजकारण महत्त्वाचे आहे. तसेच मुळनिवासी विरोधात स्थलांतरीत असाही संघर्ष पहावयास मिळतो.

**५) बांग्लादेश**

बांग्लादेश हा मुस्लिम बहुल राष्ट्र असून येथे हिंदू—मुस्लिम संघर्ष असून यातून बांग्लादेशातील धर्मामुळे अतिरेकी संघर्ष वाढला आहे. ज्यातून हिंसक संघर्ष वाढला आहे.यातून हिंदू आणि हिंदू मंदिरे, पुजारी यांच्या वारंवार हत्या होताना दिसून येतात.

**६) मालदीव**

मालदीव हे अरबी समुद्रातील बेट असून सैनिकी व्युहरचनेच्या दृष्टिकोनातून १२०० बेटांच्या मालदीव या देशाला महत्व अधिक आहे. मालदीव हा मुस्लिम बहुल देश असून तेथे भारतातून रोजगारानिमित्य गेलेले लोकांच्यात संघर्ष दिसून येतो.

**७) म्यानमार**

म्यानमार हा लष्करी व्यवस्थेतील देश असून या देशात बराच काळ लष्करी व्यवस्था अस्तित्वात होती. म्यानमार मध्ये रोहिंग्य मुस्लिम यांचा प्रश्न सध्या उग्र स्वरूपात झालेला आहे. जो आंतरराष्ट्रीय दृष्टया जटील बनला आहे. म्यानमार मधील आराकान ज्यास सद्या राखाइन प्रात म्हणून ओळखले जाते येथील रोहिंग्ये मुस्लिमांच्या नागरिकत्वाचा प्रश्न निर्माण झाला असून म्यानमार सरकार त्यांना बांग्लादेशी माणून नागरिकत्व देण्यास नकार देत आहे. त्यांच्या देशातून हिसकावून लावण्यासाठी हिंसक संघर्ष सुरू झाला आहे.

दक्षिण आशियाई देशांमधील संघर्ष हा वंश, धर्म यांच्या दृष्टीनेच आहे. या संघर्षाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) दक्षिण आशियाई राष्ट्र हे ब्रिटीश साम्राज्याच्या वसाहतवादाचा भाग होते. यावेळी ब्रिटीशांनी कामानिमित्य एका प्रदेशातील लोक दुसऱ्या प्रदेशात घेवून गेले होते. उदा. श्रीलंकेत चहाच्या बागेत काम करण्यासाठी तमिळ लोकांना श्रीलंकेत घेवून गेले तसेच म्यानमारमधील आराकान प्रातांत मुस्लिमांना कामानिमित्य नेले. या विस्थापनामुळे त्या देशाच्या स्वातंत्र्यानंतर नागरीक हक्काचा प्रश्न निर्माण झाला.

२) दक्षिण आशियाई राष्ट्रात धर्माचे असलेले प्राबल्य हे संघर्षासाठी कारणीभूत असून हिंदू, मुस्लिम, बौद्ध हे प्रमुख धर्म असून या धर्माला मानणारे व त्याचे अनुकरण करणारी लोकसंख्या धार्मिक संघर्षात असलेली दिसते. येथे धर्माविषयी असलेला अभिमान व धर्म टिकवण्याची लालसा यातून धार्मिक संघर्ष दिसून येतो. उदा. भारतात हिंदू—मुस्लिम, श्रीलंकेत बौद्ध—हिंदू धर्मीय संघर्ष होय.

३) दक्षिण आशियाई राष्ट्रातील धार्मिक व पंथीय संघर्ष ही हिंसक असल्याचे दिसते. ज्यात मुस्लिम धर्मातील शिया—सुन्नी संघर्ष, श्रीलंकेतील सिंहली व तमिळ संघर्ष, म्यानमार मधील बौद्ध—रोहिंग्य मुस्लिम संघर्ष हे वांशिक संघर्ष असून यातून मानवी हक्काची पायमल्ली होत असून यातून व्यक्तीचे हक्क डावलले जात असतात.

४) दक्षिण आशियाई देशातील राजकीय अस्थिरता ही संघर्षाला कारणीभूत आहे. दक्षिण आशियाई राष्ट्रात म्हणजे पाकिस्तान, बांग्लादेश, म्यानमार या देशात लष्कराचा प्रभाव व लोकशाहीची पायमल्ली दिसून येते. तसेच धर्मातीत राज्याचा स्विकार केल्याने धर्माच्या दृष्टीनेच व्यवस्थाही मार्गक्रमण करतात. तसेच संरक्षण ही देतात त्यामुळे हिंसक संघर्ष जास्त प्रमाणात दिसून येतो. यात राजकीय अस्थिरता महत्त्वपूर्ण आहे.

५) दक्षिण आशियाई देशातील प्रादेशिक विकासाचे कारणही महत्त्वपूर्ण आहे. कारण प्रादेशिक विकासातील असमतोल हा काही देशात संघर्षास कारणीभूत ठरलेला आहे. त्यास धार्मिक किणार असून प्रादेशिक मागासलेपणामुळे संघर्ष निर्माण झाला आहे. पाकिस्तानमधील बलुचिस्तान, श्रीलंकेतील जाफना प्रांत, म्यानमारमधील आराकान प्रांत हे प्रादेशिक असमतोलामुळे संघर्ष वाढलेला दिसतो. तसेच या प्रादेशिक असमतोलाला धार्मिक किणारही कारणीभूत असलेली दिसते.

६) दक्षिण आशियाई देशातील प्रदेशातील सरकार पुरस्कृत दहशतवाद ही अशांततेला कारणीभूत आहे. पाकिस्तानमधील बलुचिस्तान प्रदेशातील संघर्ष हा पाकिस्तान सरकार पुरस्कृत असून त्यातून या प्रदेशात संघर्ष प्रखर झाला आहे. श्रीलंकेतील जाफना प्रांतातील संघर्ष श्रीलंका सरकार पुरस्कृत आहे. तसेच म्यानमार मधील शासनाने आराकान प्रांतातील रोहिंग्य मुस्लिमांवरील अत्याचार शासनाकडून केला जातो. या पुरस्कृत दहशतवादामुळे संघर्षांत निरंतर वृध्दी दिसून येते.

७) दक्षिण आशियातील भारतीय उपखंड हा प्रदेशातील भारत या देशात ही वांशिक, धार्मिक संघर्ष दिसून येतात. भारतात आर्य, द्रविड व मंगोलियन वंशाचा संघर्ष असून हया संघर्षाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. तसेच मुस्लिम शासकानंतर हिंदू—मुस्लिम हा धार्मिक संघर्ष भारतात दिसून येतो.

या प्रकारे दक्षिण आशियाई राष्ट्रामध्ये धर्म, वंश व प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने संघर्ष दिसतो. व सातत्याने त्यात वाढ झालेली दिसते. दक्षिण आशियाई देशातील प्रदेश ब्रिटीश साम्राज्याच्या अधिपत्याखाली होते. त्यामुळे या प्रदेशात ब्रिटीशांनी राबविलेल्या 'फोडा व झोडा आणि फोडा व राज्य करा' या तत्त्वाचा अवलंब केला ज्यातून धर्म, जातीय तेढ निर्माण झाली. ज्यातून दक्षिण आशियाई प्रदेशात जातीय व धार्मिक संघर्ष निर्माण झालेला दिसतो. व स्वातंत्र्यानंतर याचे उग्र स्वरूप दिसून येते.या संघर्षातूनच पुढील समस्या निर्माण झालेल्या आहेत.

**१) निर्वासितांचा प्रश्न**

दक्षिण आशियाई देशामधील राष्ट्रातील अंतर्गत यादवी संघर्षाने निर्वासितांचा प्रश्न उग्र स्वरूपात निर्माण झाला आहे. १९४७ ला भारत—पाकिस्तान फाळणीतून हिंदू—मुस्लिम संघर्षातून निर्वासितांचा प्रश्न निर्माण झाला होता. म्यानमार मधील बौद्ध व रोहिंग्य मुस्लिम संघर्षातून रोहिंग्य मुस्लिमांचे जवळच्या देशात जसे भारत, बांग्लादेशात पलायन झाले. त्यातून या देशात निर्वासितांचा प्रश्न उग्र स्वरूपात निर्माण झालेला आहे. श्रीलंकेत तमिळ—सिंहली संघर्षातून तमिळांचे भारतात निर्वासन झाले आहे. भारतामध्ये निर्वासितांचा प्रश्न एक समस्या बनत चालला आहे. ज्यांत बांग्लादेश, म्यानमार, श्रीलंका या देशांमध्ये धार्मिक व वांशिक संघर्षातून निर्वासितांचे लोंढे भारतात येत आहेत. ज्यातून भारतीय व्यवस्थेवर ताण पडत असून सामूहिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**२) दहशतवाद**

दक्षिण आशियातील संघर्षाची पार्श्वभूमी दहशतवाद निर्मितीस कारणीभूत आहे. धार्मिक व वांशिक संघर्षातून त्या—त्या प्रदेशामध्ये दहशतवादी गट सक्रिय होताना दिसतो. ज्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरही मदत मिळत असल्याचे दिसून आले. भारत हा पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा बळी ठरला असून संपूर्ण भारतात विविध स्फोट घडवून दहशत निर्माण करण्याचे मनसुबे पाकिस्तानचे दिसून येतात. भारतातील या दहशतवादाला हिंदू—मुस्लिम संघर्षाचा किनारा आहे. तसेच श्रीलंकेमध्ये तमिळ दहशतवाद बांग्लादेशामध्ये धार्मिक अतिरेकी दहशतवाद, पाकिस्तानात धार्मिक दहशतवाद दिसून येतो.

**३) मुलतत्त्ववादाचा प्रसार**

आपला धर्म व धर्माचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी प्रत्येक राष्ट्र राजकारण करत असलेले दिसते. या धर्माभिमानामुळे बहुसंख्यांकांचे अल्पसंख्यांकांवर अत्याचार वाढलेले दिसतात. ज्यात श्रीलंकेत सिंहलीकडून तमिळांवर अत्याचार, भारतात हिंदूकडून मुस्लिमांवर अत्याचार, म्यानमारमध्ये बौद्धांकडून मुस्लिमांवर अत्याचार दिसून येतो. यात आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतो. यातून धर्म प्रसाराचा प्रभाव वाढल्याचे व ही उग्र समस्या निर्माण झालेली दिसते.

**४) धर्माधिष्ठीत राजकारण**

दक्षिण आशियाई संघर्षातून धर्माधिष्ठ राजकारणाची समस्या सुरू झाली. प्रत्येक राजकीय व्यवस्था ही धर्माला अनुसरून राजकारण करत असल्याचे दिसते. यातून समस्या निर्माण झालेली आहे.

**५) समाजाच्या विघटनाची समस्या**

दक्षिण आशियाई संघर्षातून समाजाचे विघटनाची समस्या निर्माण झाली. ज्यातून समाजात दुफळी माजली आहे. तसेच समाजात अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अशा प्रकारे दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये वरील विविध समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. या समस्यातून या राष्ट्रांमध्ये अशांतता निर्माण झालेली दिसते. यातून या राष्ट्रांचा विकास ही मंदावलेला आहे. ही समस्या सोडवायची असेल तर धार्मिक समन्वय निर्माण केला पाहिजे. ज्यातून या राष्ट्रातील धार्मिक संघर्ष कमी होईल व सर्व लोकांना जीवन जगण्याचा हक्क प्राप्त होईल. हा संघर्ष मानवी हक्काची पायमल्ली करणारा आहे. या दृष्टीने प्रत्येक राष्ट्राने धर्माच्या दृष्टीने विचार न करता विकासाचा दृष्टिकोन निर्माण केला पाहिजे आणि सर्वसमावेशक राजकारण करून सहिष्णू समाजाच्या निर्मितीवर भर दिला पाहिजे.

## संदर्भ


१) तळवलकर गोविंद (२०१५) भारत आणि जग, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

२) भोरजार प्रतिभा (संपा.) (२०१४) २१ व्या शतकातील भारतीय परराष्ट्र धोरणापुढील आव्हाणांचे व्यवस्थापन, आधार प्रकाशन, अमरावती.

३) देवळाणकर शैलेंद्र (२०१४) भारत आणि जग: भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा संबंध, सकाळ प्रकाशन, पुणे.

४) देवळाणकर शैलेंद्र (२०१३) समकालीन जागतिक राजकारण, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.